झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील
समस्या /तक्रारीचे निराकरण
करण्यासाठी उच्च स्तरिय समितीची
नियुक्ती.

महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- याचिका - २००७/प्र.क्र.३६१/झोपसु-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १५ नोव्हेंबर, २००७.

शासन निर्णय

प्रस्तावना : ताडदेव येथील तुळशीवाडी येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये अनियमितता झाले असल्याचे निदर्शनास आल्याने तुळशीवाडी नवनिर्माण सहकारी गृहनिर्माण सोसायटी यांनी मा. उच्च न्यायालय, येथे रिट याचिका क्र. १३२६/२००७ दाखल केली होती. तसेच या बाबत इतरही याचिका उच्च न्यायालयात दाखल झाल्या होत्या. सदर रिट याचिका या दि. १.११.२००७ रोजी एकत्रित सुनावणीसाठी आल्या असता, सुनावणी अंती मा. उच्च न्यायालयाने खालील प्रमाणे आदेश दिले आहेत.

"झोपडपट्टी पुनर्विकासाबाबत विविध अधिनियम/नियमात आवश्यक त्या दुरूस्त्या करण्यात अमंलबजावणी होण्याच्या दृष्टीकोनातुन योजनेसंबधीत प्राप्त होणा-या विविध स्वरूपातील तक्रारी/समस्याचे निराकरण करण्यासाठी राज्य शासनाने प्रधान सचिव यांचे अध्यक्षतेखाली एक उच्च स्तरिय समिती गठीत करावी. समितीमध्ये १) मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, २) उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, ३) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, व ४) आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांचा समावेश करण्यात यावा."

मा. उच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेवुन त्यानुसार समिती गठीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :- तुळशीवाडी येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील अनियमिततेबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेल्या रिट याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार खालील प्रमाणे उच्च स्तरिय समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| उच्च स्तरिय समितीची रचना | १. प्रधान सचिव (गृहनिर्माण) | अध्यक्ष |
| | २. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (त्यांच्या अनुपस्थितीत सह महानगर आयुक्त दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी) | सदस्य |
| | ३. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका (त्याच्या अनुपस्थितीत अतिरिक्त आयुक्त यांचे दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी) | सदस्य |
| | ४. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण | सदस्य |
| | ५. उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण | सदस्य |

उच्च स्तरिय समितीची कार्यकक्षा खालील प्रमाणे राहिल.

१. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत समाविष्ट केल्या जाण्याच्या पात्रता/निकषावरून होणारे वाद
२. पात्र असुनही योजनेत समाविष्ट न केले जाण्यासंबंधीचे वाद.
३. सहकारी गृहनिर्माण सोसायटया व विकासक यांच्यातील वाद.
४. योजना मंजुर झाल्यानंतर विकासकानी ती वेळेवर किंवा नीट न राबविण्याविषयीचे तंटे.
५. संक्रमण शिबिरासंबंधीचे वाद.
६. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व अन्य प्राधिकारी/तक्रारी/गा-हाण्यांची दखल घेत नसल्याबाबतच्या तक्रारीसंबंधीच्या बाबी.
७. शासकीय, निमशासकीय संस्था व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणमधील वाद.
८. झोपडपट्टी पुनर्वसन योजना सुरळीतपणे राबविण्यासाठी मा. अध्यक्षांना आवश्यक वाटतील अशा बाबी.
९. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसंबधीत झोपडीधारकांच्या ज्या काही समस्या/तक्रारी असतील त्यांचे निराकरण या समितीमार्फत केले जाईल.
१०. उच्च स्तरिय समितीची महिन्यातुन किमान एक बैठक आवश्यक राहील.
११. उच्च स्तरिय समितीस आवश्यक वाटेल त्या वेळी समितीला अर्जदार, विकासक व संबंधीत अधिकारी यांना आवश्यकतेनुसार बोलाविण्याचे अधिकार राहतील.
१२. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्यांचा क्र. संकेतांक क्र. २००७१११५१२५८४९००१ असा आहे.

मा. राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(स्वा. शि. क्षत्रिय)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन मुंबई.
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री (महसुल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यमंत्री (नगरविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यमंत्री (महसुल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई.
मा. महाअधिवक्ता, मुंबई उच्च न्यायालय मुंबई.
मा. अप्पर मुख्य सचिव (नगरविकास), मंत्रालय, मुंबई.
मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, महापालिका मार्ग, मुंबई.
महानगर आयुक्त, मुबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण वांद्रे, मुंबई.
मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.

उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण गृहनिर्माण भवन, मुंबई
विशेष कार्य अधिकारी, धारावी विकास प्रकल्प, झेपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वाद्रे (पुर्व), मुंबई - ५१.
जिल्हाधिकारी, मुंबई शहर, जुने जकात घर, मुंबई.
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, वांद्रे मुबंई.
अप्पर जिल्हाधिकारी, मुंबई शहर, जुने जकात घर, मुंबई.
अप्पर जिल्हाधिकारी, (अति/निष्का) पश्चिम उपनगर, मुबंई.
अप्पर जिल्हाधिकारी, (अति/निष्का) पुर्व उपनगर, मुबंई.
निवड/झोपसु १, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.